सिह मंत्री, अलने ... जिंकले.

मिळविलेला आहे.

# उद्योगांच्या विकासाकरिता मोदी सरकार कटिबद्ध : ना. अनंत गीते

मुंबई, ता. १९ भारतीय अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देणारया आणि औद्योगिक उत्पादन व निर्यातीबरोबरच रोजगार निर्मितीसारख्या क्षेत्रात अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणारया लघु व मध्यम उद्योगांच्या विकासाकरिता मोदी सरकार कटिबद्ध असल्याची ग्वाही देताना या उद्योगांच्या सर्वांगीण विकासाकरिता केंद्राकडून सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन केंद्रीय अवजड उद्योगमंत्री अनंत गिते यांनी दिले.

लघु व मध्यम उद्योग विकास चेंबर ऑफ इंडिया आणि इंडिया इंटरनॅशनल ट्रेड सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने येथे आयोजित करण्यात आलेल्या परिषदेच्या उदघाटन आणि पुरस्कार वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

यावेळी केंद्र सरकारच्या परमाणू ऊर्जा विभागाचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर, कॅनरा बँकेचे चेअरमन आर. के. दुबे, आयुर्विमा महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक एन. बी. मैनाक, स्टेट बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक पी. के. मल्होत्रा, सीडबीचे व्यवस्थापकीय संचालक एन. के. मैनी आणि लघु व मध्यम उद्योग विकास चेंबर ऑफ इंडियाचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत साळुंखे आदी उपस्थित होते.

श्री. गीते म्हणाले, नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारमुळे केंद्रीय पातळीवर भारताची पत सुधारत असून विदेशी उद्योजक, गुंतवणूकदारांचा उद्योगधंदे उभारण्याच्या

भरीव प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळेच भारतीय लघु व मध्यम उद्योगांना अच्छे दिन आनेवाले है.

चंद्रकांत साळुंखे यांनी प्रास्ताविकात देशांतर्गत लघु व मध्यम उद्योगांच्या समस्यांचा आढावा घेत या उद्योगांसमोरील अडचणी मांडल्या. मोठ्या उद्योजकांकडून लघु व मध्यम उद्योगांकडून योग्य सहाकार्य मिळत नसल्याची खंतही व्यक्त केली.

यावेळी श्री. गीते आणि काकोडकर यांच्या हस्ते लघु व मध्यम उद्योग विकास चेंबर ऑफ इंडिया आणि इंडिया इंटरनॅशनल ट्रेड सेंटरच्या संयुक्त विद्यमाने स्थापित करण्यात आलेल्या वर्ल्ड एसएमई ट्रेड सेंटरचे आणि कॅनरा बँकेच्या एमएसएमई एक्स्पो टर्म लोन स्किम फॉर एक्स्पोर्ट या विशेष योजनेचा प्रारंभ करण्यात आला.

दरम्यान, यावेळी श्री. गीते यांच्या हस्ते उद्योग आणि सेवा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या २० उद्योजकांना चेंबरच्या वतीने इंडिया एसएमई एक्सलेन्स अवॉर्ड या पुरस्काराने गौरविण्यात आले.

यामध्ये तेलवणे पॉवर इक्विपमेंट लिमिटेडचे राकेश तेलवणे, प्रताप ऑरगॅनिक्स लिमिटेडचे प्रतापसिंग देशमुख आणि राधेया मशिनिंग लिमिटेडचे संजय अंबादासराव जोशी या मराठी उद्योजकांचा समावेश होता.

परिषदेसाठी देशभरातून ५०० उद्योजक उपस्थित होते.